आदेश

श्रीमती वेरोणीका आनंदराव ब्राम्हणे,
आरोग्य सेवक महिला यांचेवर ठेवण्यात
आलेले दोषारोप त्यांनी मान्य केल्याने
शिस्तभंग कारवाई करणे बाबत

जिल्हा परिषद अहमदनगर
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रं.आरोग्य/कार्या 2/आस्था 4/948/2018
दिनांक 15 डिसेंबर 2018

वाचा :- 1) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. अहमदनगर यांचेकडील आदेश क्र हणुमंतगाव कॅम्प ता. राहाता दि. 20/01/2011
2) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. अहमदनगर यांचेकडील दोषारोप ज्ञापन क्र आरोग्य/कार्या 2/आस्था 4/211/2011 दि.30/04/2011
3) श्रीमती वेरोणीका आनंदराव ब्राम्हणे, आरोग्य सेवक महिला यांचा दिनांक 07/05/2011 रोजीचा खुलासा
4) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. अहमदनगर यांचेकडील आदेश क्र आरोग्य/कार्या 2/आस्था 4/358/11 दि. 09/06/2011
5) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. अहमदनगर यांचेकडील अंतीम कारणे दाखवा नोटीस क्र आरोग्य/कार्या 2/आस्था 4/357/2011 दिनांक 09/06/2011
6) श्रीमती वेरोणीका आनंदराव ब्राम्हणे, आरोग्य सेवक महिला यांचा दिनांक 22/06/2011 रोजीचा खुलासा
7) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम 1967 (3)
8) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 (6)
9) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अहमदनगर यांची दि. 04/12/2018 रोजीची मान्य टिपणी

संदर्भ क्रमांक 1 च्या आदेशान्वये आपण आरोग्य सेवक महिला या पदावर प्राथमिक आरोग्य केंद्र कोल्हार बु उपकेंद्र हणुमंतगाव येथे कार्यरत असतांना गैरहजर / मुख्यालयास न राहुन गैरवर्तन केल्याने आपणास सेवा निलंबीत करण्यात आले होते. संदर्भ क्रमांक 2 अन्वये आपणा विरुध्द गैरशिस्त / गैरवर्तणुकी बाबत दोषारोप 01 ते 04 बजावण्यात आलेले होते. संदर्भ क्रमांक 3 अन्वये आपण दोषारोप मान्य करुन खुलासा सादर केलेला होता. संदर्भ क्रमांक 4 अन्वये सेवेत पुन:स्थापीत करण्यात आलेले आहे. संदर्भ क्रमांक 5 अन्वये अंतीम कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली असुन संदर्भ क्रमांक 6 अन्वये आपण अंतीम कारणे दाखवा नोटीसचा खुलासा सादर केलेला आहे.

दोषारोप क्रमांक 1 मुख्यालयात हजर नसले बाबत. :- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांनी दिनांक 20/01/2011 रोजी उपकेंद्र हणुमंतगाव प्राथमिक आरोग्य केंद्र कोल्हार बु ता. राहाता येथे भेट दिली असता आपण मुख्यालयात हजर नव्हत्या.

खुलाशामध्ये दोषारोप मान्य केलेला आहे.

दोषारोप क्रमांक 2 मुख्यालयी वास्तव्य करुन रहात नसले बाबत. :- मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांनी दिनांक 20/01/2011 रोजी उपकेंद्र हणुमंतगाव प्राथमिक आरोग्य केंद्र कोल्हार बु ता. राहाता येथे भेट दिली असता आपण मुख्यालयात वास्तव्य करुन राहत नसल्याचे आढळून आले.

खुलाशामध्ये दोषारोप मान्य केलेला आहे.

तथापी आपण दिलेल्या खुलाशा मध्ये आपणास अंतीम कारणे दाखवा नोटीसमध्ये नमुद केलेली शिक्षा अन्याय करणारी कठोर शिक्षा होईल. माझ्या मतीमंद मुलीवर त्यांचा परिणाम होईल तरी मला प्रस्तावीत शिक्षा करु नये व नैसर्गिक न्याय दयावा अशी विनंती केलेली आहे.

श्रीमती वेरोणीका आनंदराव ब्राम्हणे, आरोग्य सेवक महिला यांचा खुलासा अंशतः मान्य करण्यात येत आहे. तथापी मुख्यालयास वास्तव्य करुन रहाणे क्रमप्राप्त असतांना मुख्यालयास राहीलेल्या नाहीत. सबब आपण महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम 1967 चे नियम 3 चा भंग केलेला आहे. त्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 नियम 4 (एक) नुसार **ठपका ठेवणे ही शिक्षा अंतीम करण्यात येत आहे.** सदर आदेशाची अमंलबजावणी तात्काळ करण्यात यावी व संबधीताचे मुळ सेवा पुस्तकात याची नोंद घ्यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल इकडे सादर करावा.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक 201812151004113 असा आहे.

13/12/18

(विश्वजीत माने)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,

श्रीमती वेरोणीका आनंदराव ब्राम्हणे, आरोग्य सेवक महिला

द्वारा :- वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र कोल्हार बु ता. राहाता जिल्हा अहमदनगर

प्रत :- वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र कोल्हार बु ता. राहाता

2/- सदरचा आदेश श्रीमती वेरोणीका आनंदराव ब्राम्हणे, आरोग्य सेवक महिला यांना बजावुन त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेतलेली प्रत तात्काळ इकडेस सादर करावी.

13/12/18

(विश्वजीत माने)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर